नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १५/०१/२०२६ (गुरूवार )**

## कन्हाळगाव येथे देशी /विदेशी दारूच्या बाटलीचे बुच आणि लेबल बदलुन बनावटीकरण करून जास्त दरात दारू विक्री करून शासनाची फसवणुक करणाऱ्यांवर गुन्हा नोंद, २ आरोपी अटक १९ लाख ५७ हजारांचा मुद्देमाल जप्त

**पोलीस स्टेशन बुटीबोरी** :— दिनांक १४/०१/२०२६ रोजी अंमली पदार्थ विरोधी पथक पेट्रोलिंग करीत असताना गुप्त बातमीदाराकडून खात्रीशीर माहिती मिळाली की, पोलीस स्टेशन बुटीबोरी अंतर्गत कन्हाळगाव येथील आशिष दारोटे यांच्या घरी दारूबाबत अवैध व्यवसाय चालू आहे. सदर माहीती मिळताच नमुद पथकाने बुटीबोरी पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखा यांच्यासह संयुक्त कारवाई करत सदर माहितीची पडताळणी करणे कामी नमुद पोलीस पथकाने पंचासमक्ष आशिष दारुटे यांच्या घराची झाडती घेतली. सदर घरझडतीत विविध देशी/विदेशी दारू कंपन्यांचे झाकण (बुच) आणि स्टिकर/लेबल आदी साहित्य मिळून आले. **या प्रकरणात पोलिसांनी आरोपी आशिष दारोटे, ३६ वर्ष, रा. सातगाव ह.मु वाडीभस्मे यांचे घरी गल्ली क्रं ३, अयोध्या नगर, नागपुर आणि जितेंद्रसिंग रणजीतसिंह ठाकुर, वय २५ वर्ष, रा. गणेश मंदीरा जवळ, रामनगर, वर्धा यांना ताब्यात घेतले.** त्यांच्याकडे पोलीसांनी कसून चौकशी केली असता महीती मिळाली की, नमुद आरोपी हे मध्य प्रदेशातून कमी किंमतीत दारू खरेदी करून अवैधरित्या दारू आणुन दारूच्या बाटलींचे बूच व स्टिकर/ लेबल बदलून जास्त किंमतीत अवैध विक्री करत होते. नमुद आरोपी ही दारू नागपुर जिल्हयालगतच्या जिल्हयात सुध्दा विक्री करीता नेत असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. सदर कारवाईत पोलिसांना देशी दारू ,विविध विदेशी दारू कंपन्यांचे बूच,

स्टिकर, तसेच विदेशी दारू मिळुन आली. तसेच घटनास्थळावरील आरोपीच्या चारचाकी वाहनाची झडती घेतली असता त्यात सुध्दा विदेशी दारू मिळुन आली. **नमुद आरोपी हे शासनाचा कुठलाही परवाना नसतांना आपले आर्थिक फायद्यासाठी मध्यप्रदेश येथे विक्री कामी असणाऱी विदेशी दारु ची महाराष्ट्रात वाहतुक करुन , तिच्यावरील लेबल, झाकण बदलवुन अधिक दराने विक्री करणे करीता साठवणुक करतांना मिळुन आले आहेत. नमुद आरोपीतांनी अशा प्रकारे बनावटीकरण करून महसुल बुडवुन शासनाची फसवणुक केल्याचे निष्पन्न झाले.**

**नमुद कारवाईत पोलीसांनी पंचासमक्ष १) ४८ नग बॉक्स मधील विविध देशी दारू भिंगरी तसेच विदेशी दारू ROYAL STAG WHISKY, MC DOWELLS No 1, OFFICER CHOICE, IMPERIAL BLUE, OC BLUE अशा विविध कंपन्यांचे बूच २) एका पिशवी मध्ये विदेशी दारूचे लेबल/स्टिकर , ३) विदेशी दारू OFFICER CHOICE १८० मिली च्या ११८ बॉटल्स् आणि ROYAL STAG ६० बॉटल्स्, ४) मारुती सुझुकी कंपनिची अल्टो चारचाकी वाहन कं एम एच २० इजे १३१५, ५) दुचाकी वाहन क्रमांक एम एच ४९ बी ५७१४ ,६) ३ अॅड्रॉईड मोबाईल आणि ७) रोख रक्कम २२२०/— रूपये असा एकुण १९,५७,५२० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

**नमुद प्रकरणी आरोपीतांवर पोलीस स्टेशन बुटीबोरी येथे कलम ६५ (अ) (ई) ,८१,८३ महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम ,कॉपी राईट अॅक्ट, ट्रेडमार्क अॅक्ट अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. वर नमुद दोन्ही आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. दोन्ही आरोपी दिनांक १७/०१/२०२६ पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मध्ये आहे.**


20.EJ.1315



## नायलॉन मांजा विक्री तसेच वापर करणाऱ्यांबाबत तात्काळ तक्रार नोंदवावी किंवा पोलीसांना माहीती दयावी, नागपुर ग्रामीण पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन

नागपुर ग्रामीण पोलीस दलातर्फे पोलीसांना आवाहन करण्यात येते की, मा. उच्च न्यायालयाच्या दिनांक १२/०१/२०२६ च्या आदेशान्वये सायबर पोलीस स्टेशन, नागपूर ग्रामीण यांनी नायलॉन मांजाच्या विक्री /वापराबाबत तक्रार करण्यासाठी किंवा माहिती देण्यासाठी एक WhatsApp ग्रुप तयार केला असुन . नागरिकांनी नायलॉन मांजा बाबतीत तक्रारी साठी ८३८००७२२३६ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधून किंवा WhatsApp वरून माहीती दयावी. आपल्या तक्रारीची तात्काळ दखल घेतल्या जाईल.

## पर्यावरणास अपायकारक तसेच जिवीतास धोकादायक असणारा प्रतिबंधीत नायलॉन मांजा विक्री करणाऱ्या तसेच पतंग उडविणाऱ्या ०२ आरोपीतांविरूद्ध ०२ गुन्हे नोंद ०५ नायलॉन मांजा चक्रीसह ४ हजार १०० रूपयांचा मुद्देमाल जप्त आरोपीतांना दंड भरणेबाबत नोटीस बजावली

**दिनांक १४/०१/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयात पर्यावरणास अपायकारक तसेच जिवीतास धोकादायक असणारा प्रतिबंधीत नायलॉन मांजा विक्री करणाऱ्या तसेच पतंग उडविणाऱ्या आरोपीतांविरूद्ध खालील प्रमाणे ०२ गुन्हे नोंदविण्यात आले आहे.**

**पोस्टे काटोल** :— काटोल पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, दोडकीपुरा येथे गळपुरा चौकाकडे जाणाऱ्या रोडवर **आरोपी चेतन अशोकराव मानकर, रा. दोडकीपुरा काटोल ता. काटोल** हा आपले दुकानात नायलॉन मांजाची विक्री करीत आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे काटोल पोलीस तात्काळ घटनास्थळी पोहचुन दुकानाची पंचासमक्ष झडती घेतली असता प्रतिबंधीत नायलॉन मांजा मिळुन आला. आरोपीचे ताब्यातून १) ०४ नग नायलॉन मांजा प्लॉस्टीक चक्रीसह किंमती ३६००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. **मा उच्च न्यायालयाच्या दिनांक १२/०१/२०२६ च्या आदेशन्वये पोलीसांनी वर नमुद आरोपी याला २,५०,०००/— रूपये दंड भरणेबाबत नोटीस बजावलेली आहे.**

**पोस्टे कन्हान :–** दिनांक १४/०१/२०२६ रोजी कन्हान पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, पिपरी रामनगर, येथील गाडेघाट रोड येथे **आरोपी अक्षय जयराम कोरवते, वय ३० वर्ष, रा. वार्ड क्र. ०७, रामनगर, पिपरी, कन्हान ता. पारशिवनी** हा त्याचे ताब्यातील प्लास्टीक चक्रीला असलेल्या हिरव्या रंगाचे नायलॉन मांजानी पतंग उडवित आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे कन्हान पोलीस तात्काळ घटनास्थळी पोहचले असता आरोपी हा नायलॉन मांजानी पतंग उडविताना मिळाल्याने पंचासमक्ष आरोपीचे ताब्यातून प्लॉस्टीक चक्रीसह किंमती ५००/– रूपयाचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त केला आहे. **मा उच्च न्यायालयाच्या दिनांक १२/०१/२०२६ च्या आदेशन्वये पोलीसांनी वर नमुद आरोपी याला २५,०००/– रूपये दंड भरणेबाबत नोटीस बजावलेली आहे.**

**दोन्ही कारवाईत ०५ नग नायलॉन मांजा प्लॉस्टीक चक्रीसह किंमती ४१००/– रूपये असा एकुण ४,१००/– रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**नमुद प्रकरणी दोन्ही आरोपीतांविरूध्द कलम १२५, २२३ भा.न्या. सं. सहकलम ५, १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हे नोंद करण्यात आले आहे.**

## खुन करणाऱ्या आरोपीला तात्काळ केले अटक
## बोरी पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन बुटीबोरी :–** फिर्यादी नामे अभिजित वसंता नेवारे, वय २२ वर्ष, रा. निखाडे ले आऊट, सातगाव, ता. हिंगणा, जि. नागपूर यांनी बोरी पोलीस स्टेशनला माहीती दिली की,दिनांक ०९/०१/२०२६ रोजी फिर्यादीचे वडील वसंता रामाजी नेवारे, वय ४८ वर्ष हे नेहमीप्रमाणे रात्री ०९/३० वा. पर्यंत त्यांच्या मोटारसायकल ने कामावर गेले व दुस–या दिवशी दिनांक १०/०१/२०२६ रोजी सकाळी १०/०० वा. पर्यंत नेहमीप्रमाणे कामावरून घरी न आल्याने फिर्यादीने नातेवाईक व ओळखीचे लोकांकडे तसेच परिसरात त्यांचा शोध घेतला परंतु ते मिळून आले नाही. त्यांची मो.सा. सातगाव येथील एका दारूचे दुकानाजवळ सापडली. त्यामुळे फिर्यादीने पोलीस स्टेशन बुटीबोरी येथे त्यांचे वडील बेपत्ता असल्याबाबत मिसींग तक्रार दाखल केली.

मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात बुटीबोरी पोलीसांनी गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे सदर बेपत्ता व्यक्तीचा शोध घेतला असता

दिनांक १०/०१/२०२६ रोजी सातगाव चौक येथे फिर्यादीचे वडील हे **लोकेश धाबोर्डे** याचे सोबत बोलत असल्याचे निष्पन्न झाले. पोलीसांनी आरोपी **लोकेश उर्फ लंक्या हिरालाल धाबोर्डे, २८ वर्षे रा. सातगाव, रिधोरा** याला ताब्यात घेवुन त्याचे कडे कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्याने फिर्यादीचे वडील मृतक नामे वसंता रामाजी नेवारे, वय ४८ वर्ष, यांना वडगाव गुजर ,ता.जि नागपुर येथे नेवुन खुन केल्याचे कबुल केले. नमुद प्रकरणी कलम १०३(१),३(५) भा.न्या.सं. २०२३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **आरोपीला अटक करण्यात आली आहे.** खुनाचे कारण अजुन स्पष्ट नाही. बुटीबोरी पोलीस सदर गुन्हयाचा तपास करीत आहेत.

## जनावरांची अवैधरित्या निदर्यतेने वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, ०२ वाहनामधील ०५ गोवंश जनावरांची सुटका, नरखेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन नरखेड** :— दिनांक १४/०१/२०२६ रोजी नरखेड पोलीसांना गुप्त बातमीदारद्वारे माहीती प्राप्त झाली की, नरखेड ते मोवाड रोड, नाडेकर हायस्कुल जवळ अवैधरित्या जनावरांची वाहतुक करणारे दोन वाहन मिळुन आले आहे. अशी माहीती मिळताच पोलीसांनी घटनास्थळी जावून पाहणी केली असता नमुद ठिकाणी १) पिकअप वाहन क्र. एम एच ४० सी टी १७६९ २) टाटा एस वाहन क्र एम एच ०४ एच डी १८३९ हे दोन वाहन मिळुन आले. वाहन क्र. १. पिकअप वाहन क्र. एम एच ४० सी टी १७६९ चा चालक **१) गोपाल शिवलाल कवडती वय २७ वर्ष रा. रमना, नरखेड** हा असुन नमुद वाहनामध्ये ०३ गोवंश (बैल) मिळुन आले. **वाहन क्र. २.** टाटा एस वाहन क्र एम एच ०४ एच डी १८३९ चा चालक आरोपी **जावेद युसुफ शेख, वय ३८ वर्ष, रा. वरूड, जि. अमरावती** हा असुन नमुद वाहनामध्ये ०२ गोवंश (बैल) मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले.

**पोलीसांनी पंचासमक्ष दोन्ही वाहनामधील एकुण ०५ बैल जनावरे किंमती १,२५,०००/— रूपये व दोन्ही वाहने किंमती ५,५०,०००/—रूपये असा एकुण किंमती ६,७५,०००/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला. जनावरांबाबत विचारपुस केली असता वाहन**

**क्रं १ मधील जनावरे चंद्रभान मारोतराव कोसरे यांच्या मालकीची असुन वाहन क्रं २ मधील जनावरे सुरज सिताराम सिंगर यांच्या मालकीची असल्याचे नमुद आरोपीतांनी सांगितले. सुटका केलेल्या जनावरांना जय श्रीकृष्ण गौशाळा गोंडेगाव येथे दाखल करण्यात आले आहे.**

**नमुद प्रकरणी वाहन चालक आरोपी १) गोपाल शिवलाल कवडती, वय २७ वर्ष, रा. रमना, नरखेड २) जावेद युसुफ शेख, वय ३८ वर्ष, रा. वरूड, जि. अमरावती ३) चंद्रभान मारोतराव कोसरे, वय ४५ वर्ष, ४) सुरज सिताराम सिंगर, वय ३० वर्ष, दोन्ही रा. पंढरी मोहगा, ता. सौंसर (मध्यप्रदेश्र) यांचेविरूध्द प्राण्यांचा छळ प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद कुही पोलीस यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कुही** :— दिनांक १५/०१/२०२६ रोजी कुही पोलीस पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, उमरेड कडुन १० चक्का ट्रक क्र एम एच ४० सीटी ४३५८ मध्ये अवैधरित्या रेती ची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी पाचगाव शिवार उमरेड नागपुर हायवेवर श्रीकृष्ण लॅड डेव्हलपर्स चे लेआउट जवळ नाकाबंदी केली असता १० चक्का ट्रक क्र एम एच ४० सीटी ४३५८ मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असतात्यामध्ये रेती आढळुन आली. **वाहन चालक पवन सुनिल बोकळे, वय २८ वर्ष, रा. चिचाळा ता. भिवापुर जि. नागपुर हा मिळुन आला.** नमुद आरोपीला रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्यांच्याकडे कोणताही परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली.

**पोलीसांनी पंचासमक्ष वर १० चक्का ट्रक क्र एम एच ४० सीटी ४३५८ किमती ४०,००,००० /—रूपये आणि ४ ब्रास रेती किंमती २०,०००/— रूपये आणि असा एकुण ४०,२०,०००/रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**नमुद आरोपी यांच्या विरूध्द पोस्टे कुही येथे कलम ३०३(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम,**

**सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**




## जनावरांना निर्दयतेने /क्रुरतेने वागणुक देणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## ५ गोवंश जनावरांची सुटका,मौदा पोलसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन मौदा** :— दिनांक १५/०१/२०२६ रोजी मौदा पोलीसांना माहीती प्राप्त झाली की, मौजा खंडाळा (गा.) येथील शमशान घाटाजवळ काही गायी व गोरे याना चारा पाण्याची व्यवस्था न करता निर्दयतेने बाधुन ठेवलेले आहे .अशी माहीती मिळताच मौदा पोलीसांनी तात्काळ घटनास्थळी जावुन पाहणी केली शमशान घाटाजवळ दोन गाय व तिन गोरे हे रस्सीच्या दोरखंडाने बांधुन ठेवलेल दिसले व त्याचा साठी कोणतीही चारापाण्याची व्यवस्था केली नव्हती. पोलसांनी चौकशी केली असता आरोपी १) अशोक बर्वे २) चुडामन सोनवाने

दोन्ही रा. खंडाळा यांनी शमशान घाटाजवळ रस्सीच्या दोरखंडाने दोन गायी व तिन गोरे बाधुन ठेवले त्यांनी जनावरांना कुठल्याही प्रकारचे चारा पाण्याची व्यवस्था केलेली नसल्याचे समजले. पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून ५ गोवंश जनावरे किंमती ५०,००० /— रूपये यांची सुटाक केली.

नुमद प्रकरणी दोन्ही आरोपीतांविरूध्द प्राण्यांचा छळ प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## नगरधन किल्ला परीसाराबाबत..

दिनांक १०/०१/२०२६ चे एका वृत्तपत्रात की, नगरधन किल्ल्याभोवतीचे अतिक्रमण काढा अशा शिर्षकाखाली बातमी प्रसीध्दी झाली आहे. सदर प्रकरणाची सविस्तर माहीती अशी आहे की, भारतीय पुरातत्व विभाग, नागपुर यांच्या प्राप्त आदेशानुसार तहसिलदार, रामटेक यांनी नगरधन किल्ला परीसारात कोणतेही बांधकाम प्रशासनाच्या परवानगिशिवाय करू नये तसेच ३०० मिटर परीसारात अतिक्रमण करू नये अशा आशयाचे फलक लावण्याचे आदेश तसेच असलेले अतिक्रमण काढयाबाबत आदेश ग्रामपंचायत नगरधन यांना दिले. तहसिलदार यांच्या आदेशाने नगरधन ग्रामपंचायत यांनी ठराव पास करून नगरधन किल्ल्याच्या ३०० मिटर परीसरात कुठल्याही प्रकारचे अतिक्रमण न करण्याबाबताचा जाहीर सुचनेचा फलक किल्ल्याच्या दर्शनी भागात लावलेला आहे.




मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने